# महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

**डॉ. एम. बी. चौगले, अर्थशास्त्र विभागप्रमुख, बॅ.बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय वेंगुर्ला.**

......................................................................................................................

**गोषवारा** :— महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांना तत्कालीन आणि आधुनिक काळात अनन्यसाधारण महत्व आहे. गांधीजी अर्थतज्ञ नव्हते पण त्यांच्या आर्थिक विचारांची दखल संपूर्ण विश्वाला घ्यावीशी वाटली. मूल्यप्रधान नैतिक आणि मानवकेंद्रित दृष्टिकोन हा गांधीच्या आर्थिक विचारांचा पाया आहे. दुर्बल व्यक्तीला बळी देऊन सखल व्यक्तीला द्रव्यसंचय करण्यास समर्थ बनविण्यास अर्थशास्त्राला गांधीचा प्रखर विरोध होतो. म्हणूनच त्यांनी आपल्या विचारांद्वारे न्यायाचे अर्थशास्त्र मांडले. गांधीजींचा अर्थशास्त्रीय अभ्यास नैतिक व अध्यात्मिक सिद्धांतावर आधारलेला आहे. साधी राहणी व उच्च विचारसरणीचा गांधीनी पुरस्कार केला. मानवी मूल्यांवर अधिक भर दिला. अर्थकारण अनर्थाचे मूळ ठरू नये असा गांधीनी विचार मांडला. बेकारी कमी करण्यासाठी श्रमप्रधान उद्योगांना चालना दिली. आर्थिक विचारसरणीतील महत्वाची कल्पना विश्वस्त कल्पना मांडली. हस्तव्यवसाय, कुटीरोद्योग, ग्रामोद्योग यांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. तसेच वर्गकलह न करता वर्गसमन्वयाने अनेक समस्याचे निराकरण होवू शकते असे गांधीनी मांडले.

**प्रस्तावना**

महात्मा गांधी यांनी देशातील किंबहुना विश्वातील आर्थिक सामाजिक आणि राजकीय चिंतनाला व कार्याला एक नवीन दिशा प्राप्त करुन दिली. खाजगीकरण, उदारीकरण जागतिकीकरण आणि आधुनिकीकरण संदर्भात गांधीजींचे आर्थिक विचार अत्यंत मौलिक आहेत. कारण वास्तव परिस्थितीत आणि बदलत्या परिस्थितीत गांधीजींचा आर्थिक विचारांची नितांत आवश्यकता आहे. महात्मा गांधीसारख्या विश्ववंद्य पुत्राने सत्य हे मनुष्याच्या बुद्धीपेक्षा श्रेष्ठ मानले कारण सत्याला साक्षीची गरज नसते.

सर्वसाधारणपणे स्वातंत्र्य, समानता विकास व सुखी मानवी जीवनासाठी विशिष्ट प्रकारच्या नैतिक व साध्या जीवनशैलीचा गांधीनी पुरस्कार केला. गांधीजी अर्थशास्त्राज्ञ नव्हते, पण सत्य, अहिंसा, सर्वोद्य, ग्रामोद्योग, धर्म, राजकारण, समाजकारण, याबाबतीतील विचारावर जेवढी चर्चा झाली. मंथन झाले, जेवढे लिखाण झाले तेवढे कोणत्याही तज्ञांच्या आर्थिक विचारांबाबत झालेले नाही म्हणजेच गांधीजींच्या आर्थिक विचारांचे मूलगामी महत्व स्पष्ट होते.

गांधीजीच्या अर्थशास्त्राचा अभ्यास हा त्यांच्या नैतिक व अध्यात्मिक सिध्दांतावर आधारलेला आहे. महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांचा विकास तीन अवस्थेत विभागलेला दिसतो. पहिली अवस्था १९१९ पर्यंत, दुसरी अवस्था १९१९ ते १९३४ आणि तिसरी अवस्था १९३४ ते १९४८ या तिन्ही अवस्थेतील विचारांचा अभ्यास केल्यानंतर असे निदर्शनास येते की, महात्मा गांधीचे आर्थिक विचार आजच्या युगात अत्यंत महत्वाचे आणि उपयोगी आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यासाठी गांधीच्या आर्थिक धोरणांना अनन्य साधारण महत्व आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतासमोर दारिद्रय, बेरोजगारी, अन्नधान्यटंचाई व वाढती लोकसंख्या अशा अनेक समस्या होत्या. देशाच्या ग्रामीण भागाचा विकास घडवून आणल्याशिवाय सर्वकक्ष आर्थिक विकासचे स्वप्न पूर्ण होणार नव्हते. म्हणून राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचे विचार डोळ्यासमोर ठेवून नियोजनकारांनी आर्थिक विकासाबाबतचे विविध उपक्रम राबविण्यावर भर देण्याचे ठरविले होते. गांधीजींचे अर्थकारणही मानवतावादार उभारलेले आहे. नफा आणि पैसा याला महत्व न देता मानवकेंद्रित अर्थव्यवस्था असावी असा गांधीजींचा आग्रह होता. दुर्बल व्यक्तीला बळी देऊन सबल व्यक्तीला द्रव्यसंचय करण्यास समर्थ बनविणाऱ्या अर्थशास्त्राला गांधींचा विरोध होता. देशाची खरी संपत्ती असणाऱ्या मनुष्यशक्तीच्या दारिद्रय, बेकारी, विषमता, शोषण, उपासमार अशा जीवघेण्या समस्या सोडविण्यास प्राधान्य देणे आणि प्रत्येक माणसाला जगण्यायोग्य परिस्थिती निर्माण करणे हे गांधीच्या आर्थिक विचारांचे उद्दिष्ट होते.

गांधीजींच्या मते, अर्थव्यवस्थेला सामाजिक जबाबदारीची जोड असावी. नफा मिळविताना न्याय व मानवता पायदळी तुडविली जाणार नाही याची काळजी अर्थव्यवस्थेत असावी. म्हणजेच गांधीप्रणित अर्थशास्त्र हे न्यायाचे अर्थशास्त्र असलेले दिसून येते.

**१) शरीरश्रम :—** 'पोटासाठी परिश्रम' या नियमाचे पालन स्वेच्छेने केले तर संतोष व आरोग्य मिळेल. प्रत्येकाने किमान काही ठराविक तास शारीरिक श्रम केलेच पाहिजेत. ''ना श्रम, ना जेवण'', असा नियम असावा असे ते म्हणतात. त्यामुळे श्रमप्रतिष्ठेची कल्पना निर्माण होऊन जो श्रम करणारा मजूर आहे त्याच्याबद्दल आत्मीयता निर्माण होईल. शरीरश्रमाने बौद्धिक उत्पादनाचाही कस वाढेल. श्रम ज्ञानपूर्वक व उच्चध्येयार्थ केले म्हणजे ते आनंददायक होऊन त्यातून नवसृष्टी निर्माण होते. मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी शरीरश्रमाची अट आवश्यक ठेवावी असेही ते सुचवितात.

**२) यंत्राचा उपयोग :—** यंत्र हे मानवी श्रमाला विरोध करते. त्यामुळे बेकार व अर्धबेकार यांच्या संख्येत भर पडते. ते मानवी परिश्रमाचे उच्चाटन करून थोड्या लोकांच्या हातात सारी सत्ता एकत्रित करणाऱ्या यंत्राला त्यांचा विरोध आहे. याने मनुष्य गुलाम बनतो. मानवाला साहाय्यकारी असणाऱ्या व त्याला होणारा त्रास कमी करणाऱ्या यंत्राला त्यांचा पाठिंबा आहे. शिवणयंत्राला त्यांचा पाठिंबा होता. ते म्हणतात, ''माझा विरोध आहे तो यंत्राच्या वेडाला, यंत्राला नव्हे. आणि ते जे वेड आहे ते श्रम वाचविणाऱ्या यंत्रांचे.'' सुधारित नांगर, तारायंत्रे, इत्यादींना त्यांचा विरोध नव्हता.

**३) वर्ग—समन्वयाचे तत्त्व :—** वर्ग कलहाची कल्पना त्यांना हिंसक वाटत होती. उलट प्रत्येक वर्गाने दुसऱ्याचे कार्य व महत्त्व ओळखून समन्वय साधावा आणि परस्पर शोषण सोडून द्यावे असे त्यांचे मत होते. जुनी वर्णाश्रमाची कल्पना त्यांनी उचलून धरली होती. कृषिवृत्तीला प्राधान्य द्यावे परंतु इतर कोणताच धंदा, व्यवसाय करणाऱ्यांनी परस्परांना कनिष्ठ लेखू नये.

वर्गयुद्ध हे भारताच्या मूळ प्रकृतीशी विसंगत आहे. आपल्याला जर अहिंसेचा संदेश कळला असेल तर भारतात वर्गयुद्ध अपरिहार्य नाही, ते टाळता येण्यासारखे आहे हे सहज पटेल असे ते म्हणतात. ''वर्ग—कलहाच्या प्रश्नाला माझे उत्तर विश्वस्तपण आहे,'' असे त्यांनी सांगितले आहे.

४) **साधेपणा** :— गांधीजींच्या मते, समाजातील प्रत्येक व्यक्तीने साधे जीवन जगण्याचा प्रयत्न केला तर सर्व प्रश्न आपोआप सुटतील. साधी राहणी उच्च विचारसरणीचा पुरस्कार गांधींनी केला. स्वेच्छेने साधेपणा व समाधानीवृत्ती अंगी बाळगली पाहिजे. भौतिक गरजा वाढवत जाऊन मिळेल ते मिळवत जाण्याची हाव बाळगण्यापेक्षा इतरांना जे मिळत नाही ते आपल्यालाही नको अशी आत्मसंयमवृत्ती जोपासणे हे व्यक्तीच्या जीवनाचे सूत्र होऊ शकेल. गांधीजींच्या मते, प्रत्येक व्यक्तीचे मन हे अस्वस्थ पक्ष्यासारखे असते, जास्त मिळवत असताना गरजा वाढत जातव व व्यक्ती असमाधानी राहते. सुखाची अवस्था ही प्रामुख्याने मानसिक अवस्था असते. प्रत्येक भारतीय माणसाने देशाची परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या गरजा कमी करायला शिकले पाहिजे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सचोटी, प्रामाणिकपणा व संयम दाखवून आचार—प्रचारात सुसंगती ठेवली पाहिजे. थोडक्यात स्वातंत्र्य, समानता, विकास व सुखी मानवी जीवनासाठी विशिष्ट प्रकारच्या नैतिक व साध्या जीवनशैलींचा गांधींनी पुरस्कार केला.

५) **मानवी मूल्ये** :— गांधींच्या अर्थशास्त्रात मानवी मूल्यातील बदल अपेक्षित आहे. त्यांनी पैसा आणि भौतिक संपत्तीपेक्षा नैतिक आणि मानवी मूल्यांवर अधिक भर दिला आहे. त्यांच्या मते, मानवी जीवनाचा सर्वांगाने अभ्यास केला पाहिजे. गांधीजींच्या मते माणूस हा सर्वोच्च विचारवंत असून त्याचे जीवन पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

६) **मोठे उद्योग यांत्रिकीकरण आणि विकेंद्रीकरणसंबंधी विचार** :— मोठ्या उद्योगधंद्यामुळे लहान उद्योग नष्ट होणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. गांधींच्या अर्थरचनेत यंत्रनिषेध नाही, यांत्रिकीकरणाला विरोध नाही, समृद्धीचाही निषेध नाही, पण जीवनाची समृद्धी जीवनाच्या व्यापकतेने मर्यादित व्हावी, विज्ञानाच्या रथाला बाजाराचा घोडा जोडला जाऊ नये व विज्ञानाच्या प्रगतीची परिणती मानवी बंधुत्वाच्या स्थापनेत व्हावी ही त्यांची आकांक्षा होती म्हणून अर्थविज्ञान हे स्वार्थ विज्ञान होऊ नये, अर्थकारण अनर्थाचे मूळ ठरू नये असा इशारा गांधींनी दिला होता. माणसाला उपकरणाचे स्वरूप येऊ नये व तो साधन न बनता साध्य रहावा म्हणून उपकरणे माणसाच्या विकासाकरिता, त्यांच्या इंद्रियांच्या कौशल्यात भर टाकणारी असावीत. मोठ्या उद्योगधंद्यात यंत्राचा फार मोठ्या प्रमाणात वापर होतो. त्यामुळे अनेक आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे गांधींचा जीवनाच्या तत्वज्ञानावर आधारित मोठ्या उद्योगांना विरोध होता. गांधीजींच्या मते, मानवी वैफल्य, हिंसा व युद्ध यासाठी आधुनिक तंत्रविषयक, नागरीकरण कारणीभूत ठरते. यामुळे मानवाच्या भौतिक गरजा अधिक गतीने वाढत जातात. मानवी श्रमावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या बेरोजगार वाढीस कारणीभूत ठरणाऱ्या केंद्रीकरणाला चालना देणाऱ्या मोठ्या उद्योगाबाबत व त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या यंत्रास गांधीजींचा विरोध होता.

ग्रामोद्योगांना संरक्षण दिले पाहिजे. आपल्या देशात भांडवलाची कमतरता असल्यामुळे कमी भांडवल लागणारे लहान उद्योगांचा नियोजनपूर्वक विकास घडवून आणणे काळाची गरज आहे. महात्मा गांधींनी भारतीयांची अर्थरचना आपल्या डोळ्यासमोर ठेवली होती. ती उतरंडीसारखी राहणार नाही तर पाण्यातील तरंगासारखी राहील असे त्यांनी मान्य केले होते. खेडे हा भारताचा चक्रबिंदू आहे असे ते मानत आणि खेड्यापासून सुरू

होणाऱ्या लहान तरंगातून अगर वलयातून फार मोठी वलये निर्माण होतील हा त्यांच्या अर्थव्यवस्थेचा पाया होता.

७) **बेकारी** भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशात श्रमपुरवठा अधिक असल्याने त्याचा पर्याप्त वापर करण्याच्या दृष्टीने गांधीनी ग्रामोद्योगांचा व लहान उदयोगांचा पुरस्कार केला होता. अशा श्रमप्रधान उद्योगांमुळे बेकारी कमी होऊन श्रमिकांचे जीवन सुसह्य होईल. गांधींनी मोठ्या यंत्रांच्या वापराला विरोध दर्शविला होता. कारण अशा यंत्रामुळे बेकारी निर्माण होऊन भांडवलदार व कामगार यांच्यात संघर्ष निर्माण होऊन सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येऊ शकते. यामुळे श्रमिकांना रोजगार उपलब्ध करणे जसे महत्वाचे आहे. तसेच समाजात श्रमाची प्रतिष्ठा वाढविणेही अत्यंत महत्वाचे आहे. काम कोणतेही असो ती सर्व कामे समाजासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे श्रम कोणत्याही प्रकारचे असो त्याला समाजात प्रतिष्ठा मिळायला पाहिजे. यासाठी महात्मा गांधींनी श्रमप्रधान समाजरचनेचा स्वीकार केला. त्यांचे हे विचार आधुनिक काळात देखील अत्यंत उपयुक्त आहेत. त्यामुळे हे विचार आचरणात आणणे संपन्न, समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी काळाची गरज आहे.

८)**ग्रामोद्योग** :— हस्तव्यवसाय, कुटीरोद्योग इत्यादींना त्यांच्या दृष्टीने फार महत्व होते. ग्रामीण बेकारी व दारिद्रय नष्ट करून देशातील पैसा परदेशात जाणे बंद व्हावे म्हणून, तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्वयंपूर्णता यावी यासाठी ग्रामोद्योगाला प्राधान्य दिले. खादी आणि चरखा यांना या कल्पनेत मध्यवर्ती स्थान आहे. हिंदुस्थानातील सात लाख खेडी जिवंत ठेवावयाची असतील, आणि सर्व सुधारणांच्या मुळाशी असणारी शांतता प्राप्त करून घ्यावयाची असेल तर सर्व लोकांनी स्वयंरोजगाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ग्रामोद्योगाच्या वस्तू वापरून आपण त्या उद्योगांचे पुनरुज्जीवन करीपर्यंत आपल्याला खेड्यांच्या प्रतिष्ठापनेचे साध्य सिद्ध करता येणार नाही. खादी हा प्रमुख ग्रामोद्योग आहे.

शेतीतून निर्माण होणाऱ्या कापसापासून, शेतीची इतर कामे करीत असताना, घरीच सूत काढून व चरख्यावर कापड विणून खादी तयार होऊ शकत असल्याने शेतकरी आपला रिकामा वेळ कार्यात गुंतवू शकतो, द्रव्यार्जनही करू शकतो. यामुळे अर्धबेकारीची समस्या नष्ट होऊन त्याची आर्थिक स्थितीही सुधारते व निदान अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गरजांच्या बाबतीत शेतकरी आणि खेडी स्वयंपूर्ण होतात. खादी ही गरिबांना श्रीमंताच्या पाशातून मुक्त करते आणि वरिष्ठ वर्ग व सामान्य जनता यांच्यामध्ये एक नैतिक व आध्यात्मिक पाया निर्माण करते.

**समारोप** :— भारताला किंबहुना जगाला सुद्धा आगामी काळात गांधीचे आर्थिक विचार अनुसरण्याशिवाय गत्यंतर नाही. कारण आर्थिक असमानतेच्या विरुद्धात गांधींनी विचार मांडले. देशातील प्रत्येक व्यक्तीला त्याच्या गरजा भागविण्यासाठी ज्यावेळी समान संधी प्राप्त होईल त्याचवेळी त्या व्यक्तीचा आणि पर्यायाने देशाचा सर्वंकष विकास होईल. साधेपणा, अहिंसा, मानवी मूल्यांची जोपासना, ग्रामोद्योग उद्योगांचे विकेंद्रीकरण, वर्गसमन्वय, विश्वस्तपणा, बेकारी सर्वोदय योजना, अन्नधान्यांबाबत भूमिका, लोकसंख्याबाबत विचार, श्रमप्रतिष्ठा असा गांधीच्या सर्व आर्थिक विश्लेषणातून भावी काळात बदलणाऱ्या परिस्थितीचे यथार्थ चित्र दिसून येते. वरील प्रत्येक मुद्द्यातून गांधींनी सर्वसमन्वय व सुवर्णमध्य साधून न्यायाचे अर्थशास्त्र संपूर्ण जगासमोर आणले. ग्रामीण

विकास आणि दरिद्री माणसाच्या विकासाला गांधीजींच्या आर्थिक विचारात प्राधान्य होते. त्यांचया आर्थिक विचारात सामाजिक न्याय होता. म्हणूनच सध्या गांधींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करावाच लागेल. कारण राष्ट्राची प्रगती आणि राष्ट्राचा नैतिक दर्जा यात समतोल निर्माण करणारे गांधी अर्थशास्त्र आहे.

**निष्कर्ष :**

१. महात्मा गांधींच्या अर्थशास्त्रात मानीव मूल्यांतील बदल अपेक्षित आहे.

२. महात्मा गांधीच्या मते, देशातील दहा टक्के(१०%) माणसांची श्रीमंतीत वाढ झाली म्हणजे देश सधन नाही तर इतर ९०% माणसांच्या हाताला काम मिळाले तरच देश सधन व समृध्द बनेल.

३. अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी बचत अधिकाधिक करावी असे गांधीजी म्हणाले होते. त्यावेळी गांधींनी मांडलेले आर्थिक तत्वज्ञान आजही तेवढेच खरे आहे. कारण कोरोनासारख्या जागतिक आपत्तीनंतरही ज्या देशाची बचत अधिक होती असे देश सक्षम राहिले. याचे प्रत्यय तत्कालीन अर्थतज्ज्ञांच्या लिखाणातून निदर्शनास येते.

**संदर्भसूची :**

१. महात्मा गांधी : जीवन चरित्र, कृष्ण कृपलानी, अनुवाद उमाकान्त ठोमरे — नॅशनल बुक ट्रस्ट,
इंडिया नवी दिल्ली,१९९४

२. अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास., प्रा. के.एच. ठक्कर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ५ सप्टेंबर,२००५.

३. आर्थिक विचारांचा इतिहास, प्रा. डॉ. जे. एफ पाटील -फडके प्रकाशन, कोल्हापूर जुलै २००९.

४. नई तालीम, गांधी प्रणित शिक्षण विषयक प्रयोगांचा इतिहास, प्रा. रमेश पानसे -डायमंड
पब्लिकेशन्स, पुणे जानेवारी, २००७.

५. मातृवंदना, श्री श्रीपतराव कृ पाटील, महाग्रंथ प्रकाशन, महाराष्ट्र ग्रंथ भांडार १८ ऑक्टोबर,२०१८.

६. सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, मो.क. गांधी, अनुवादक - सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद, एप्रिल २००४.

७. राजकीय विचारवेदी -श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर (पाश्चिमात्य आणि भारतीय) श. गो. देवगावंकर

८. प्रकाश किरणे -श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रा.डॉ. सौ. छाया बकाणे.

९. दैनिक पुढारी -''अर्थव्यवस्थेतेलाहवे बचतिचे प्रोत्साहन'' १० फेब्रुवारी २०२३

१०. अर्थसंवाद, जानेवारी मार्च २०१४/२०१५